स्वातंत्र्यसैनिकांचा त्याग व योगदान प्रेरणादायी - पालकमंत्री संजय राठोड >>पान 2

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सीपीआर रुग्णालयाच्या नूतनीकरण कामांचे लोकार्पण >>पान 3

पाय धुण्यासाठी उतरले अन् काळाने घात केला; कोराडी प्रकल्पातील खोल खड्ड्यात बुडून दोन मावस भावांचा दुर्दैवी मृत्यू >>पान 4

सुविचार

यशासाठी धडपडणाऱ्यांची निंदा होतेच, त्याची चिंता नका करू.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 26 ■ सोमवार, दि. 10 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



हे अत्यंत लज्जास्पद! फॅनने चक्क कॅमेरासमोरचे केले लिप-लॉक किस

आतील पान

# महाराष्ट्र टँकरमुक्त करण्याचे अण्णासाहेब डांगे यांना श्रेय - मुख्यमंत्री

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'आम्रवृक्ष' आत्मचरित्राचे प्रकाशन व आष्टा शैक्षणिक संकुलातील विविध इमारतींचे लोकार्पण

- डॉ. अण्णासाहेब डांगे यांचा नागरी सत्कार
- शिक्षण, समाजसेवेच्या प्रदीर्घ वाटचालीला मानाचा मुजरा
- 'आम्रवृक्ष' आत्मचरित्राचे प्रकाशन

दैनिक आपला विदर्भ

**सांगली । प्रतिनिधी :** ज्येष्ठ नेते अण्णासाहेब डांगे हे महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रातील भीष्म पितामह असून, धडधाकट शरीरयष्टी, कणखर आवाज, शिस्त आणि दरारा हे त्यांचे गुण वाखाणण्यासारखे आहेत. तळागाळातील जनतेचे प्रश्न प्रशासकीय पकड व सखोल अभ्यास याद्वारे त्यांनी सोडवले असून, महाराष्ट्राला टँकरच्या जाळ्यातून मुक्त करण्याचे श्रेय अण्णासाहेब डांगे यांना जाते, असे कौतुकोद्गार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.



वाळवा तालुक्यातील आष्टा येथे माजी मंत्री डॉ. अण्णासाहेब डांगे यांचे अभिष्टचिंतन, 'आम्रवृक्ष' आत्मचरित्राचे प्रकाशन आणि आष्टा शैक्षणिक संकुलातील शैक्षणिक इमारतींचे उद्घाटन अशा संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील होते. अण्णासाहेब डांगे शैक्षणिक संकुल, आष्टा येथे आयोजित या कार्यक्रमास सत्कारमूर्ती डॉ. अण्णासाहेब डांगे यांच्यासह विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्यासह राज्यसभा सदस्य धनंजय महाडिक, लोकसभा सदस्य धैर्यशील माने, आमदार सर्वश्री अरुण लाड, सदाभाऊ खोत आणि धैर्यशील कदम तसेच डॉ. सुरेश खाडे, विनय कोरे, सुधीर गाडगीळ, गोपीचंद पडळकर, सत्यजीत देशमुख, अशोक माने आणि सुहास बाबर, संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अ‍ॅड. राजेंद्र डांगे, सहसचिव विश्वनाथ डांगे यांच्यासह डांगे कुटुंबीय आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शिक्षण, समाजकारण आणि सार्वजनिक जीवनात प्रदीर्घ काळ योगदान देणारे संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष तथा माजी मंत्री डॉ. अण्णासाहेब डांगे यांच्या वयाच्या ९१व्या वर्षात पदार्पणानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. तसेच, यावेळी त्यांच्या जीवनप्रवासाचा वेध घेणाऱ्या 'आम्रवृक्ष' या आत्मचरित्राचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

अण्णासाहेब डांगे हे आपल्यासाठी पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आहे. >>पान २

## अहिल्यानगरमध्ये महापालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यावर हल्ला, उपचारादरम्यान मृत्यू; चौघांना अटक

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर । प्रतिनिधी :** शहरात एका युवकाची हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली असून शहरात खळबळ उडाली आहे. महानगरपालिकेच्या विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने कुटुंबीयांनी आक्रोश केला. शुक्रवारी संध्याकाळी मुकुंदनगर दर्गा दायरा परिसरात कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी हे पोलचे काम करत असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आला होता. मुकुंदनगर परिसरातील कबरस्तानमधील विद्युत पोलचे काम सुरू असताना ही घटना घडली होती. तर, हल्ल्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले होते. दरम्यान, गंभीर जखमी धीरज परदेशी याला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे.

कंत्राटी कर्मचारी असलेल्या धीरजवर नेमकं हल्ला का झाला, याचा तपास पोलीस करत आहेत. या हल्ल्याच्या घटनेनंतर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी काल रात्री फरार मुख्य चार आरोपी युनूस शेख, मेहराज सय्यद,सिराज सय्यद आणि मुस्तकीम सय्यद यांना अटक केली आहे. तर धीरज परदेशी याच्यावर झालेला हल्ला हा कोणत्या करणाने झाला होता, त्याचे नेमकं कारण अद्याप अस्पष्टचं आहे. मात्र, तो हिंदुत्ववादी होता म्हणून त्याला मारण्यात आल्याचा आरोप धीरजच्या पत्नीने केला आहे. तर शहरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली असून अहिल्यानगरमध्ये हिंदुत्ववादी संघटनांकडून बंदचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, माझ्या पतीला ज्या कबरस्थानमध्ये मारहाण झाली, त्या कबरस्थानमध्ये त्यांचा अंतविधी करावा अशी मागणीही मयत धीरज परदेशीच्या पत्नीने रडत रडत केली. या घटनेचं गांभीर्य ओळखून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली जात आहे.

## आता, २५ हजारांच्या नोकरीसाठी बोगस परीक्षा; संभाजीनगरमध्ये हजारो उमेदवारांची फसवणूक, विद्यार्थी संतप्त

**संभाजीनगर । प्रतिनिधी :** वैद्यकीय प्रवेशासाठी महत्त्वाची आणि अनिवार्य असलेल्या ऱ्एएऊ परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला. त्यानंतर, जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनात देशभरातील तरुणाईचा सक्रीय सहभाग पाहायला मिळाला. त्यातूनच, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदाचा राजीनामाही द्यावा लागला. मात्र, अद्यापही परीक्षा आणि नोकरीवरुन उमेदवारांची फसवणूक सुरूच असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, सीजेपीचं नेतृत्व करणाऱ्या अभिजीत दीपकेंच्या संभाजीनगरमध्ये नोकरीच्या (द्वं) आमिषाने हजारो युवकांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

विमानतळावर आकर्षक नोकरी देण्याचे आमिष दाखवत एका खासगी कंपनीने महाराष्ट्रातील हजारो सुशिक्षित बेरोजगारांना गंडा घातल्याचा आरोप करण्यात येत आहे. शासकीय भरतीप्रमाणेच पारदर्शक प्रक्रिया असल्याचा देखावा निर्माण करून प्रत्येक विद्यार्थ्याकडून ५०० ते ७०० रुपयांची फी उकळण्यात आली. महिन्याला २५ हजार रुपयांचा पगार आणि विमानतळावरील झगमगीत नोकरीच्या आमिषाला बळी पडत राज्यभरातील शेकडो विद्यार्थी आज छत्रपती संभाज नगरच्या उस्मानपुरा येथील एका शाळेत पोहोचले, पण आपली फसवणूक झाल्याचा दावा आता या विद्यार्थ्यांनी केला आहे.




## भारतासाठी रशियाची मोठी योजना; हिंद महासागरापर्यंत रेल्वे मार्ग उभारण्याचा विचार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी :** भारत आणि रशियामधील व्यापार संबंध आणखी मजबूत करण्यासाठी रशिया नव्या पर्यायी मार्गाचा विचार करत आहे. रशियातून हिंद महासागरापर्यंत रेल्वे मार्ग उभारण्याची शक्यता तपासली जात असून, या माध्यमातून भारतासह आशियातील देशांशी जमिनीवरील व्यापार वाढवण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. रशियाचे उपपंतप्रधान मरात खुसनुलिन यांनी सरकारी वृत्तसंस्था TASS ला दिलेल्या मुलाखतीत याबाबत माहिती दिली.

सध्या रशिया आणि भारतामधील व्यापारासाठी मोठ्या प्रमाणात सागरी मार्गाचा वापर केला जातो. मात्र, बोस्फोरस आणि स्ट्रेट ऑफ हॉरमुझसारख्या महत्त्वाच्या सागरी मार्गावरील वाढत्या जोखमी लक्षात घेता पर्यायी मार्ग तयार करण्याची गरज



असल्याचे रशियाचे मत आहे. रेल्वे मार्ग विकसित झाल्यास सागरी वाहतुकीवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होऊ शकते. प्रस्तावित मार्ग मध्य आशिया आणि पश्चिम आशियातील काही देशांमधून जाण्याची शक्यता आहे. यामध्ये तुर्कमेनिस्तान, इराण, अफगाणिस्तान आणि पाकिस्तानचा समावेश होऊ शकतो. हा मार्ग प्रत्यक्षात साकारल्यास रशियातून भारतापर्यंत माल पोहोचवण्यासाठी नवा ट्रेड कॉरिडॉर तयार होऊ शकतो. त्यामुळे मालवाहतुकीसाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध होण्यासोबतच व्यापाराचा वेळही कमी होण्याची शक्यता आहे. हॉरमुझच्या वाढत्या महत्त्वामुळेही रशियाची चिंता वाढली आहे. हा जलमार्ग जागतिक तेल आणि व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या भागातील सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारावर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे रशियाला आपल्या व्यापारासाठी अधिक सुरक्षित आणि स्थिर पर्याय तयार करायचा आहे. भारत हा रशियाचा महत्त्वाचा व्यापारी भागीदार आहे. ऊर्जा, संरक्षण आणि इतर क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांचे संबंध आहेत. त्यामुळे भारताशी थेट भू-मार्गाने जोडणी झाल्यास व्यापाराला आणखी चालना मिळण्याची शक्यता आहे. मात्र, अनेक देशांमधून जाणारे हे मोठे रेल्वे नेटवर्क उभारण्यासाठी मोठी गुंतवणूक, सुरक्षा व्यवस्था आणि संबंधित देशांचे दीर्घकालीन सहकार्य आवश्यक असेल. त्यामुळे ही योजना प्रत्यक्षात येण्यासाठी मोठे आव्हान पार करावे लागणार आहे.

## धवलतीर्थ धबधब्याच्या कुंडात बुडून २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**चाळीसगाव :** जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील प्रसिद्ध पाटणादेवी येथील धवलतीर्थ धबधबा परिसरात घटना घडली. धबधब्याच्या मंदिराच्या पाठीमागील कुंडातील पाण्यात बुडून २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. कृष्णा संतोष गायकवाड असं या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या तरुणाचं नाव आहे. कृष्णा हा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. पावसाळ्याच्या दिवसात पाटणादेवी आणि धवलतीर्थ परिसरात निसर्गरम्य वातावरण निर्माण होतं. त्यामुळं या परिसरात मोठ्या संख्येनं पर्यटक आणि नागरिक येत असतात. मात्र, याच काळात धबधबे, कुंड, नदीपात्र आणि जलाशयांमध्ये पाण्याची पातळी अचानक वाढते. यामुळे दुर्घटनांचा धोका मोठ्या प्रमाणात असतो. अशाच धोकादायक परिस्थितीत ही घटना घडल्यामुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## समृद्धी महामार्गावर आरटीओ कारवाईने चालकाने ट्रक केला आडवा, अमरावतीजवळ वाहतूक कोंडी

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर । प्रतिनिधी :** वाहतूक व्यवस्था सुरळीत व्हावी आणि कमी वेळात अधिक अंतर गाठता यावे यासाठी नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग तयार करण्यात आला. मात्र, कधी अपघात तर कधी येथील समस्यांमुळेच हा महामार्ग अधिक चर्चेत असतो. समृद्धी महामार्गावर आवश्यक सुविधाही नसल्याने नागरिकांची ओरड असते. अनेक रस्त्यावर कठडे लावून ठेवले जातात. तर थोड्या चुकांसाठीही प्रवाशांची अडवणूक केली जाते. त्यामुळे नागरिक आणि वाहतूक पोलिसांमध्ये अनेकदा वाद होतो. असाच काहीसा वादाचा प्रकार रविवारी नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर घडला. यामुळे ट्रक चालकाने चक्क त्याचा मोठा ट्रक रस्त्याच्या मधोमध उभा केला. यामुळे अनेक काळ वाहतूक कोंडी झाली होती.

नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर आरटीओच्या कारवाईनंतर संतप्त झालेल्या ट्रकचालकाने चक्क ट्रक महामार्गावर आडवा केल्याची घटना अमरावतीजवळ घडली. ट्रक मार्गिकेत आडवा उभा राहिल्याने समृद्धी महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली असून, दोन्ही



बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. मिळालेल्या माहितीनुसार, आरटीओच्या पथकाकडून संबंधित ट्रकवर कारवाई करण्यात आली. या कारवाईनंतर चालकाने संतापाच्या भरात ट्रक महामार्गावर आडवा उभा केल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे महामार्गावरील वाहनांची ये-जा काही काळ ठप्प झाली.

ट्रक आडवा झाल्याने समृद्धी महामार्गावरील वाहतुकीवर त्याचा मोठा परिणाम झाला. ट्रकच्या दोन्ही बाजूंनी वाहनांची गर्दी वाढत गेली. काही वेळातच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांना मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. समृद्धी महामार्गावर आधीच वेगाने वाहतूक सुरू असते. अशा परिस्थितीत जड वाहन महामार्गावर आडवे उभे राहिल्याने वाहतूक व्यवस्थेवर ताण निर्माण झाला. अनेक वाहनचालकांना बराच वेळ कोंडीत अडकून पडावे लागले.

घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणा आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी आडवा उभा असलेला ट्रक हटविण्याची कार्यवाही करण्यात आली. दरम्यान, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांकडून वाहतूक व्यवस्थापन करण्यात आले. या घटनेमागे आरटीओच्या कारवाईचा संदर्भ असल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. मात्र, ट्रकवर नेमकी कोणत्या कारणामुळे कारवाई करण्यात आली आणि त्यानंतर चालकाने ट्रक महामार्गावर आडवा का केला, याबाबत अधिकृत माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. दरम्यान, समृद्धी महामार्गासारख्या महत्त्वाच्या द्रुतगती मार्गावर वाहन आडवे उभे करून वाहतूक रोखल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला. या घटनेचा पुढील तपास संबंधित यंत्रणांकडून करण्यात येत आहे.

# मनोज जरांगे पाटलांची बावनकुळेंवर व्यंगात्मक टीका; म्हणाले, हडप्पा संस्कृती अन् अजंठा लेणीप्रमाणे दिसणारा प्राणी

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर । प्रतिनिधी :** मराठा आरक्षणाचे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी संध्या मराठा आरक्षण आणि जात प्रमाणपत्र रद्द संदर्भाने दौरा करत आहेत. कालपासून ते सोलापूर दौऱ्यावर असून आज पंढरपुरातूनही त्यांनी राज्यातील सत्ताधारी नेत्यांवर हल्लाबोल केला. यावेळी, भाजप नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही टोकाची टीका केली. बावनकुळे हे नाव कधी ऐकलेच नाही, मुळव्याध ऐकलं आहे. आमचे कुळ तर ९६ कुळ आहे, हे बावनकुळ कुठने काढले. बावनकुळे प्राणी असा विचित्र दिसतो. पूर्वीच्या हडप्पा संस्कृतीमधील मोहानजोदाडो प्रमाणे व अजंठातील लेणीप्रमाणे हा माणूस दिसतो, अशा शब्दात मनोज जरांगे पाटील



यांनी पुन्हा एकदा चंद्रशेखर बावनकुळे यांच्या व्यंगावर लक्ष केले.

पंढरपूर तालुक्यातील सरकोली येथे आज जरांगे पाटील यांची सभा झाली. यावेळी जरांगे पाटील यांनी बावनकुळे यांच्यावर टीका केली, हडप्पा संस्कृती व अजंठा लेणीप्रमाणे बावनकुळे हा प्राणी दिसतो, तुम्हाला तुमचा नेता प्रिय असेल पण आमची जात आमचा बाप आणि समाज हाच पक्ष असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले. आपण वर्षभर मुंबईतील आंदोलनापासून फडणवीस यांच्यावर बोललो नाही. पण, बावनकुळे जर आमची प्रमाणपत्र रद्द करणार असेल तर आम्ही बोलू. तुम्हाला तुमचा नेता प्रिय आहे. पण आमची जात, आमचा बाप, तर समाज आमचा पक्ष आहे. आम्हाला दुसरे कोणी मोठे नाही, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी बावनकुळे यांना पुन्हा एकदा पंढरपुरातून जोरदार टीका केली.

दरम्यान, कुणबी प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रकरणावरून मनोज जरांगे पाटील यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. ''बावनकुळेंनी कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यास सांगितले असून त्यांची नार्को टेस्ट करावी,'' अशी मागणी जरांगेंनी केली होती. या आरोपांवर आता चंद्रशेखर बावनकुळे यांनीही सविस्तर प्रतिक्रिया देत आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचा दावा केला. तसेच, मी नार्को चाचणीसाठीही तयार असल्याचं त्यांनी म्हटले होते.

## मनोज जरांगे पाटलांना उत्तर देणार - हाके



मनोज जरांगे मुर्खासारखा धिंगाणा घालत महाराष्ट्रात फिरतोय मंत्र्यांची मुख्यमंत्र्यांची आई माई काढतोय ओबीसीच्या मंत्र्यांच्या व्यंगावर टिंगल करतोय त्याच्या विरोधात ओबीसीची वजन मोठ बांधण्यासाठी उद्या मी सोलापुरात येत आहे अशा पद्धतीचा व्हिडिओ लक्ष्मण हाके यांनी सोशल मीडियात पोस्ट केला असून आज हाके सोलापुर जिल्ह्यातून बाहेर पडत असताना उद्या आता ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी सोलापूर मध्ये सर्व बांधवांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

## जेन झी-जेन अल्फा : डॅमेज कंट्रोलचा प्रयत्न

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी गुरुवारी मुंबईत 'जेन झी' आणि 'जेन अल्फा' या नव्या पिढीतील २ हजार विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. वरवर पाहता हा आरएसएसचा एक नेहमीचा 'बौद्धिक' उपक्रम वाटू शकतो. परंतु, या संवादाची गरज संघाला आज अचानक का भासली, याचे उत्तर शोधणे फारसे कठीण नाही. केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या कार्यपद्धतीमुळे देशातील तरुणांच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष आणि ढासळलेली विश्वासार्हता सावरणे, हेच या संवादामागचे मुख्य कारण आहे. देशातील तरुण तत्कालीन यूपीए सरकारच्या काळातील भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि प्रशासकीय अनागोंदीला कंटाळला होता. अशा वेळी भाजपने तरुणांसमोर एक आकर्षक स्वप्न मांडले. १०० 'स्मार्ट सिटीज'ची उभारणी, वर्षाला दोन कोटी नव्या रोजगारांची निर्मिती, स्वदेशी उद्योगांना आणि स्वयंरोजगाराला प्राधान्य, आधुनिक शिक्षण व्यवस्था आणि पायाभूत सुविधांचा विकास यांसारख्या ओशासनांना भुलून देशातील तरुणाईने भाजपच्या पारड्यात भरभरून मते टाकली. २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकांमध्ये भाजपला बहुमताने केंद्रात व राज्यांत सत्तास्थानी बसवण्यात या तरुण मतदारांचा मोठा वाटा होता. परंतु गेल्या दशकभरात या सर्व ओशासनांची पुरती धूळधाण उडाली आहे. विकासाच्या राजकारणाची जागा हळूहळू बदल्याच्या आणि दडपशाहीच्या राजकारणाने घेतली. विरोधकांवर केंद्रीय यंत्रणांचे छापे टाकून त्यांना तुरुंगात धाडण्याचे सत्र सुरू झाले, तर दुसरीकडे गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप असलेले नेते भाजपमध्ये प्रवेश करताच रातोरात 'वॉशिंग मशीन'मध्ये धुऊन स्वच्छ झाले. हा राजकीय दुटप्पीपणा आजची सुशिक्षित तरुणाई उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. एकीकडे विकासाची ओशासने हवेत विरली असताना, दुसरीकडे समाजात दुही माजवणारे राजकारण सुरू झाले. 'वंदे मातरम' बोलणारे देशभक्त आणि खाण्यापिण्याच्या सवयी वेगळ्या असणारे देशद्रोही ठरवले जाऊ लागले. गो-मांसाच्या संशयावरून मॉब लिंचिंगच्या दुर्दैवी घटना घडल्या आणि कायदा हातात घेणाऱ्या तथाकथित 'गो-रक्षकांच्या' नव्या टोळ्या उदयाला आल्या. देशाची अर्थव्यवस्था तीन ट्रिलियन डॉलर होत असल्याचा दावा केला जात असताना, प्रत्यक्ष बाजारात मात्र सुशिक्षित तरुण रोजगारासाठी वणवण भटकतोय. केवळ राष्ट्रीय पातळीवरील 'नीट' परीक्षेचा गोंधळच नाही, तर देशातील जवळपास प्रत्येक राज्यातून स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटीची प्रकरणे समोर येत आहेत. शिक्षणासह सर्व व्यवस्थेत अनागोंदी माजलेली असताना सरकार संवाद साधायला तयार नाही, देशाचे सरन्यायाधीश तरुणांना झुरळ म्हणून हिणवतात, अशा परिस्थितीत देशात तरुणांच्या भावनांचा उद्रेक होणार नाही तर काय. नीट पेपरफुटीनंतर खरे तर तत्कालीन शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तेव्हाच राजीनामा दिला असता तर सीजेपीच्या आंदोलनाची वेळच आली नसती. परंतु, सनदशीर आणि शांततेच्या मार्गाने सुरू असणारी आंदोलने हाताळण्यात सरकारला पूर्णपणे अपयश आले. सोनम वांगचुक यांना बळाचा वापर करून ज्या प्रकारे उचलले त्या घटनेने आंदोलनाची ठिणगी अधिकच पेटली. तरुणांशी संवाद साधण्यासाठी शिष्टमंडळ पाठवण्याऐवजी सरकारने पोलीस बंदोबस्त वाढवण्यात धन्यता मानली. आंदोलक तरुणांवर लाठीहल्ला आणि पॅलेट गन चालवून प्रकरण हाताबाहेर जाऊ दिले गेले. जेव्हा जनक्षोभ विकोपाला गेला, तेव्हा राजीनामे आणि बैठकांचे सत्र सुरू झाले. पंतप्रधान मोदी यांनी अचानक इन्स्टाग्रामवर येऊन जेन झीशी कनेक्ट होण्याचा प्रयत्न केला; परंतु तिथेही मूळ प्रश्नांवर चर्चा होण्याऐवजी त्यांच्या फॉलोअर्सच्या संख्येचीच चर्चा अधिक रंगवण्यात आली. इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की जंतर मंतरवर जमलेल्या तरुणांमधील सर्वच जण नीटची परीक्षा देणारे किंवा पेपरफुटीने त्रस्त तरुण नव्हते. तर एकूण व्यवस्थेविरोधातील राग कित्येक वर्षांपासून त्यांच्या मनात साचलेला होता. या रागाला सीजेपीच्या आंदोलनाने वाट करून दिली होती. हे समजून घेत त्यांच्याशी संवाद साधण्याची गरज होती. लोकशाहीत संवाद हा दोन्ही बाजूंचा असावा लागतो. आजही तरुणांवर लाठीमार करण्याचे आणि पॅलेट गन चालवण्याचे आदेश कुणी दिले, याचे उत्तर द्यायला सरकार टाळत आहे. पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा संसदेत येऊन उत्तर द्यायला तयार नसताना, सरसंघचालकांनी साधलेला हा संवाद म्हणजे केवळ बिघडलेली राजकीय हवा सावरण्याचा प्रयत्न वाटतो. वास्तविक, डॉ. मोहन भागवत यांनी तरुणांशी संवाद साधण्याचा आणि आंदोलकांचे ऐकून घेण्याचा हा सल्ला खूप आधीच पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांना द्यायला हवा होता. आता संवाद साधायला खूपच उशीर झालेला आहे; कारण 'तेलही गेलं आणि तूपही गेलं' अशी सत्ताधाऱ्यांची अवस्था झाली आहे. आजचा तरुण स्वाभिमानी आहे, सजग आहे आणि स्वत:च्या हक्कांबद्दल अत्यंत जागरूक आहे. आपल्या भविष्यासाठी, शिक्षणासाठी आणि रोजगारासाठी रस्त्यावर उतरणारा हा तरुण देशभक्त आहे की नाही, याचे कोणतेही प्रमाणपत्र त्यांना कोणत्याही पक्षाकडून किंवा संघटनेकडून घेण्याची अजिबात गरज नाही.

# स्वातंत्र्यसैनिकांचा त्याग व योगदान प्रेरणादायी - पालकमंत्री संजय राठोड

## हुतात्मा स्मारक उमरी येथे क्रांती दिन उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ । प्रतिनिधी :** यवतमाळ ही संघर्ष आणि स्वाभिमानाची परंपरा लाभलेली भूमी आहे. या भूमीनेही स्वातंत्र्य चळवळीत योगदान दिले असून जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांचा त्याग आणि योगदान सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी रविवारी केले.

ते बाभूळगाव तालुक्यातील उमरी (शहीद) येथील हुतात्मा स्मारक येथे आयोजित क्रांती दिन कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते.यावेळी पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करून सर्व शहीद क्रांतिवीरांना मानवंदना देण्यात आली.

कार्यक्रमाला शहीद पत्नी संगीता घोटेकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, नगराध्यक्ष संगीता मालखुरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी युवराज मेहेत्रे, कार्यकारी अभियंता माधव उघडे, तहसीलदार मीरा पागोरे, गटविकास अधिकारी ढोले, पोलीस निरीक्षक भेंडे, उपअभियंता दीपक निचळ, कनिष्ठ अभियंता कीर्ती रामेकर,



स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांच्या परिवारातील सदस्य विजय माळवी, सुरेश माळवी, सत्यदेव पाळेकर, कैलास सुलबेवार, सतीश कोटमवार, अतुल देशपांडे, कौशल्या रामटेके, नंदू बुटे, हरिभाऊ चव्हाण, शेख हसन शेख चांद, नीरज राऊत, सरपंच सोनाली शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी पालकमंत्री संजय राठोड यांनी स्वातंत्र्य संग्रामातील हुतात्मा यशवंत लुडबाजी पाळेकर, शहीद मधुकर घोटेकर यांच्यासह स्वातंत्र्यसैनिक आणि वीरांना अभिवादन केले.





अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले की, आजचा दिवस देशभक्ती आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा देणारा दिवस आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारताला मुक्त करण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्या सर्व स्वातंत्र्यवीरांमुळे आज आपण स्वतंत्र भारतात स्वाभिमानाने जगत आहोत. आज स्वातंत्र्याचा अमृतकाळ सुरू असून भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे. या देशातील प्रत्येक घटक देशसेवा करत आहे. शेतकरी, शिक्षक, विद्यार्थी, युवक, डॉक्टर, अभियंता, वकील, अधिकारी, कर्मचारी, कामगार आदी सर्वच घटक आपल्या कामातून देशसेवेचे व्रत जोपासत आहेत. देशातील प्रत्येक नागरिकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणे हीच खरी राष्ट्रसेवा असल्याचेही पालकमंत्री राठोड यांनी सांगितले.

आज क्रांती दिनी जात-पात, धर्म, भाषा आणि प्रांताच्या भिंती बाजूला ठेवून राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देऊया आणि आत्मनिर्भर व विकसित भारत घडवूया, असे आवाहन त्यांनी केले.क्रांती दिन ते स्वातंत्र्य दिन या कालावधीत १ लाख ११ हजार वृक्षलागवडीच्या कार्यक्रमाचा पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते वृक्षारोपण करून शुभारंभ करण्यात आला.यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उमरी येथील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. यावेळी पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला हरिहर लिंगनवार, श्रीधर मोहोड, उमरीच्या सरपंच सोनाली शेळके, उपसरपंच वंदना धोटे, राजुदास जाधव, गजानन डोमाळे, यशवंत पवार, संजय हातगावकर, प्रद्युम्न जवळकर, आकाश राठोड, संजय रंगे, सुरेश चिंचोळकर, सचिन महल्ले, नितीन पखाले, प्रकाश भूमकाळे, राजू पांडे, गौतम लांडगे, पप्पू पाटील भोयर, कैलास राऊत, वैभव खडतकर, निलेश काळे, अजय डोंगरे, मेघा गिरी, संतोष मिश्रा, श्रीकांत पवार, पराग चौधरी, पवन राऊत, अक्षय कुपाट, मनीष भुते आदी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी बारामती तालुक्यातील विकासकामांची केली पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**बारामती । प्रतिनिधी :** श्री क्षेत्र मयुरेश्वर गणपती मंदिराचे पुरातन व धार्मिक महत्त्व जपत प्राचीन वास्तूचे मूळ स्वरूप अबाधित ठेवून आधुनिक सुविधांचा समन्वय साधावा. मंदिर परिसरातील विकास व जीर्णोद्धाराची कामे मंजूर आराखड्यानुसार दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज दिल्या.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी बारामती तालुक्यातील श्री क्षेत्र मयुरेश्वर गणपती मंदिर परिसर तसेच मेडद येथील स्व. अजितदादा पवार शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विकासकामांची माहिती घेतली.

श्री क्षेत्र मयुरेश्वर मंदिर परिसरातील कामांचा आढावा घेताना श्रीमती पवार म्हणाल्या, मंदिराच्या जीर्णोद्धाराची कामे मंजूर आराखड्यानुसारच करण्यात यावीत. मंदिर परिसर आणि गाभाऱ्यातील स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. परिसरात पावसाच्या पाण्याचा योग्य पद्धतीने निचरा होईल, याची दक्षता घ्यावी. विकासकामे करताना ग्राम



स्थांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी सातत्याने समन्वय ठेवावा. विकासकामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असे स्पष्ट करून त्या म्हणाल्या, कामांमध्ये हलगर्जीपणा करणाऱ्या किंवा चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्या कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी. निकृष्ट अथवा चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

मेडद येथील स्व. अजितदादा पवार शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाची पाहणी

यानंतर उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी मेडद येथील स्व. अजितदादा पवार शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाची पाहणी केली. महाविद्यालय परिसरातील रस्ते विकसित करण्यासाठी आवश्यक हद्दवाढीचा प्रस्ताव तातडीने मार्गी लावावा. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच निवासाच्या सुविधांचा विचार करून महाविद्यालय आणि वसतिगृह पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने आवश्यक नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी श्रीमती पवार यांनी शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, वसतिगृह तसेच परिसरातील विविध सुविधांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांची सद्यस्थिती जाणून घेतली. तत्पूर्वी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी श्री क्षेत्र मयुरेश्वर गणपतीचे दर्शन घेतले.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, पंचायत समिती सभापती किरण तावरे, जिल्हा परिषद सदस्या रोहणी कदम (ढोले), नगराध्यक्ष सचिन सातव, पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक विलास वहाने, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, तहसीलदार स्वप्नील रावडे, गटविकास अधिकारी किरण माने, मुख्याधिकारी पंकज भुसे, स्व. अजितदादा पवार शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल काळे, मोरगाव देवस्थानचे विश्वस्त देवराज डहाळे आदी उपस्थित होते.

## ५० हजार मृत शेतकऱ्यांना कर्जमाफी, १४ लाख कर्मचारी वगळले

**मुंबई :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत तब्बल ५० हजार ८०६ शेतकऱ्यांना मरणोत्तर कर्जमाफीचा लाभ मिळाला असून यातील बहुतांश शेतकरी आत्महत्याग्रस्त अमरावती आणि मराठवाडा विभागातील आहेत. दुसरीकडे लोकप्रतिनिधी, सरकारी, निमसरकारी कर्मचारी अशा १४ लाख शेतकऱ्यांना या कर्जाफीतून वगळण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.राज्य सरकारने कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सुमारे ३६ हजार कोटींची पुण्योक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. या योजनेत ज्या शेतकऱ्यांचे ३० सप्टेंबर २०२५ पर्यत पीक कर्ज थकीत आहे, त्यांना दोन लाखाच्या मर्यादेत कर्जमाफी दिली जाणार असून नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन निधी दिला जाणार आहे. तसेच दोन लाखापेक्षा अधिक कर्ज थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्याची दोन लाखांवरील रक्कम बँकेत भरल्यानंतर एकवेळ समझोता अंतर्गत त्यांच्याही कर्ज खात्यात सरकार दोन लाख रुपये जमा करणार आहे.

पान १ वरून...

# महाराष्ट्र टँकरमुक्त करण्याचे अण्णासाहेब डांगे यांना श्रेय - मुख्यमंत्री

त्यामुळे त्यांना आपण वैयक्तिकरीत्या काही देऊ शकत नसलो तरी त्यांना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा उपहार दिला असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, '८०च्या दशकाच्या शेवटी' कर्जमाफीच्या लढ्यात सक्रिय सहभाग अण्णासाहेबांनी घेतला. या लढ्याला राजकीय स्वरूप देऊन शेतकऱ्यांच्या हक्काचा हा लढा व्यापक केला. तळागाळात जायचे असेल तर शेतकऱ्यांचे प्रश्न महत्त्वाचे आहेत, याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे आज कर्जमाफी करूनच त्यांच्या वाढदिनी आपण इथे आल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्य शासनाने ५६ लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी केली असून, त्यापैकी ६ लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर पहिल्या टप्प्यात ५ हजार कोटी रुपये जमा केले असल्याचे सांगून उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर दोन महिन्यांत पैसे जमा होतील, असे ते म्हणाले. प्रामाणिकपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांच्याही खात्यात ५० हजार रुपये भरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अण्णासाहेब डांगे पाणीपुरवठा मंत्री असताना त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र टँकरमुक्त करण्याचा धाडसी निर्धार केला. प्रत्येक गावात पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी नियोजन करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची स्थापना केली. प्रत्येक गावात पाणीपुरवठ्याचे शिवधनुष्य त्यांनी पेलले. मोगलांच्या काळात देशभरातील हिंदू देवतांच्या मूर्ती आणि मंदिरांची विटंबणा केली गेली होती. त्या सर्व देवालयांचे व घाटांचे पुनरुज्जीवन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केले. पण, त्यांच्या चौंडी या जन्मस्थानाचा शोध अण्णासाहेब डांगे यांनी घेतला आणि त्याचे पुनरुज्जीवन केले. तसेच, वाटेगाव येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचे कामही त्यांनी सुरू केले. त्यांचे कार्य राज्य शासन पुढे नेत असून, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या चौंडी येथील जन्मस्थान विकासासाठी राज्य शासनाने ७०० कोटी रुपयांचा विकास आराखडा केला आहे. तसेच, अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी वाढीव भूसंपादनाचे काम पूर्ण झाले असून, त्यांच्या भव्य स्मारकाचेही काम सुरू आहे, असे त्यांनी सांगितले.

सामाजिक क्षेत्राबरोबर शैक्षणिक कार्य करताना अण्णासाहेब डांगे यांनी महाराष्ट्रातील सर्वोत्तम आश्रमशाळा उभी केली आहे. अनेक आव्हानांच्या काळातही दीनदयाळ सूतगिरणी चांगल्या पद्धतीने सुरू आहे, असे ते म्हणाले. अण्णांना जडीबुटींचे उत्तम ज्ञान असून, ते त्यांचा वापर करून शंभरी पार करतील, असा विश्वास व्यक्त करून त्यांच्या शतकीय वाढदिनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सत्कार करू, अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, अण्णासाहेब डांगे यांनी अनेक शाळा, महाविद्यालये आणि विविध संस्था उभारल्या. या संस्थांच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील विविध घटकांना त्यांनी घडविले. राजकारणाच्या माध्यमातून त्यांनी समाजकारणाला प्राधान्य दिले. अण्णासाहेब डांगे यांचे कार्य आणि योगदान पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांना निरोगी, दीर्घ आणि आनंदी आयुष्य लाभावे, अशा सदिच्छाही त्यांनी यावेळी दिल्या.

विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, अण्णासाहेब डांगे यांच्या मार्गदर्शनामुळे अनेकांच्या जीवनाला दिशा मिळाली आहे. त्यांच्या शिस्तीचा, नियमांचा आणि स्वभावाचा आपल्या जीवनात परिपूर्ण उपयोग करून घेतला आहे. आप्पांचे मार्गदर्शन हे आपल्या जीवनाला परिवर्तनाकडे घेऊन जाणारे आहे, असे सांगून त्यांनी अण्णासाहेब डांगे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले, अण्णासाहेब डांगे यांनी कॅबिनेट मंत्री, ग्रामविकास मंत्री आणि सांगलीचे पालकमंत्री म्हणून काम करताना सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवले. राजकारणासोबतच शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोठे कार्य त्यांनी केले असल्याचे सांगून त्यांनी आजचा सोहळा हा केवळ सत्कार नसून माजी मंत्री अण्णासाहेब डांगे यांच्या ९० वर्षांच्या प्रदीर्घ, तत्त्वनिष्ठ आणि समाजोपयोगी सार्वजनिक जीवनाचा गौरव आहे, असे सांगितले.

यावेळी सत्काराला उत्तर देताना अण्णासाहेब डांगे यांनी त्यांच्या जीवनातील विविध टप्प्यांतील आठवणींना उजाळा दिला.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव ॲड. राजेंद्र उर्फ चिमण डांगे यांनी केले. सूत्रसंचालन विजय कडणे व राणी यादव यांनी केले. आभार विश्वनाथ डांगे यांनी मानले. यावेळी संस्थेचे संचालक, पदाधिकारी, मान्यवर, नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्थेचे पदाधिकारी आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शैक्षणिक संकुलात नव्या वास्तूंची भर

या सोहळ्यात शैक्षणिक संकुलातील विविध नूतन वास्तूंचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीला अधिक बळ देणाऱ्या या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मान्यवरांच्या हस्ते सुभद्रा इंटरनॅशनल स्कूल व अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ फार्मसी इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. तसेच अण्णासाहेब डांगे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीचे आभासी पद्धतीने उद्घाटन करण्यात आले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सीपीआर रुग्णालयाच्या नूतनीकरण कामांचे लोकार्पण

## ऐतिहासिक वारसास्थळाचे जतन करत अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांचा विस्तार; ६०० कोटी रुपयांहून अधिक निधीतून विविध कामे

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर । प्रतिनिधी :** पश्चिम महाराष्ट्रातील महत्त्वाचे आणि ऐतिहासिक शासकीय रुग्णालय असलेल्या छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय (सीपीआर), कोल्हापूर येथील विविध नूतनीकरण व आधुनिकीकरणाच्या कामांचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत फीत कापून व कोनशिलेचे अनावरण करून करण्यात आले.

रुग्णालयाच्या ऐतिहासिक वारसास्थळाचे जतन करत रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या पुढाकारातून विविध कामे करण्यात आली असून, त्यासाठी आत्तापर्यंत ६०० कोटी रुपयांहून अधिक निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मंत्री हसन मुश्रीफ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी सीपीआर रुग्णालयाच्या ऐतिहासिक वाटचालीसह नूतनीकरण व आधुनिकीकरणाच्या कामांवर आधारित लघुपट दाखविण्यात आला. तसेच रुग्णालयाची प्रतिमा मान्यवरांना भेट





देण्यात आली. यावेळी राजर्षी शाहू महाराज आणि राज्याचे तत्कालीन आरोग्यमंत्री स्व. दिग्विजय खानविलकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

या नूतनीकरणामध्ये रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराची कमान, मॉड्युलर बर्न आयसीयू, अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, मॉड्युलर आयसीयू, एमआरआय विभाग, अत्याधुनिक निदान व उपचार सुविधा, रुग्णांच्या नातेवाईकांसाठी निवारा शेड, तसेच विविध वैद्यकीय विभागांचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे सीपीआर रुग्णालयातील आरोग्यसेवांची क्षमता आणि गुणवत्ता अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

याशिवाय, रुग्णालयातील विविध इमारतींची दुरुस्ती, रस्ते व परिसर विकास, विद्युत व्यवस्था, फर्निचर, विविध विभागांचे बांधकाम व आधुनिकीकरण, ट्रॉमा केअर सेंटर, अत्याधुनिक ऑपरेशन सुविधा, तसेच विविध मॉड्युलर कामे करण्यात आली आहेत. या सुविधांमुळे कोल्हापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील नागरिकांना अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शासकीय आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष आमदार राजेश क्षीरसागर, जिल्हा परिषद अध्यक्षा शिल्पा खोत, महापौर रूपाराणी निकम, खासदार धनंजय महाडिक, खासदार शाहू महाराज छत्रपती, आमदार अमल महाडिक, आमदार चंद्रदीप नरके, आमदार राहुल आवाडे, आमदार अशोकराव माने, प्रधान सचिव धीरज कुमार, आयुक्त अनिल भंडारी, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, सीपीआरचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे आदी उपस्थित होते.

## महत्त्वाचे...

### मुख्यमंत्री फडणवीसांकडून पाटील कुटुंबीयांचे सांत्वन; डी. वाय. दादाच्या आठवणींना दिला उजाळा

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर । प्रतिनिधी :** माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी वाय पाटील यांच्या निधनानंतर रविवारी (दि.९) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. डी वाय पाटील यांच्या कसबा बावड्यातील यशवंत निवासस्थानी भेट देऊन पाटील कुटुंबीयांचं सांत्वन केलं. यावेळी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कोल्हापूर जिल्ह्याच्या सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, खासदार धनंजय महाडिक, आमदार शिवाजी पाटील राहुल आवारे यांच्यासह पाटील कुटुंबीयातील डॉ. संजय डी पाटील, काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील, माजी आमदार ऋतुराज पाटील, तेजस पाटील यांच्यासह पाटील कुटुंबीयातील सदस्य उपस्थित होते.

डॉ. डी. वाय.पाटील यांनी पाऊल ठेवलेल्या प्रत्येक क्षेत्रात कामाचा ठसा उमटवला : ''माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी जीवनात संघर्षातून मोठं कार्य उभं केलं. शिक्षण, सहकार आणि उद्योग क्षेत्रात प्रचंड मोठं कार्य केलं. राज्यपाल म्हणून तीन राज्यांची जबाबदारी पार पडली. त्यांनी पाऊल ठेवलेल्या प्रत्येक क्षेत्रात कामाचा ठसा उमटवला. सर्व पक्षांमध्ये त्यांचे जवळचे संबंध होते. व्यक्तीगत माझे आणि डॉ. डी. वाय. पाटील यांचे चांगले संबंध होते. ते केवळ नेते नव्हते, तर एक विचारवंत होते. त्यांना कधीही भेटलो तर त्यांच्याकडून नवीन विचार मिळायचे,'' असं म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. डी. वाय. पाटील यांना श्रद्धांजली वाहिली.

डी. वाय. दादा अचानक फोन करून घरी यायचे : ''मी बंटी साहेबांना सांगितलं. माझे आणि डी. वाय. दादांचे जुने संबंध होते. मी १९९८ साली पहिल्यांदा डी. वाय. दादांच्या घरी आलो होतो, तेव्हा मी महापौर होतो. तेव्हापासून डी. वाय. दादांचे आणि माझे संबंध आहेत. अचानक फोन करून डी. वाय. दादा घरी यायचे. त्यांच्याशी गप्पा मारणं म्हणजे स्वत:ला समृद्ध करणं, अशा पद्धतीचं त्यांचं व्यक्तिमत्व होतं,'' अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महाराणी ताराराणी गृह संकुलाचं उद्घाटन : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी सांगली आणि कोल्हापूर दौऱ्यावर आहेत. त्यांच्या उपस्थितीत कोल्हापुरातील अनेक विकासकामांचं उद्घाटन होणार आहे. कोल्हापुरातील पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर नव्यानं उभारलेल्या महाराणी ताराराणी गृह संकुलाचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सह पालकमंत्री माधुरी मिसाळ पोलीस अधीक्षक निलोत्पल आदींची उपस्थित होती.

### ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला सोने खरेदीदारांना मोठा झटका, पाच दिवसातच दरात सात हजारांची वाढ तर चांदीच्या दरात १४ हजारांची वाढ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या काही दिवसांत सोने आणि चांदीच्या दरात मोठी वाढ झाली आहे. इंडियन बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या आकडेवारीनुसार, ऑगस्ट महिन्याच्या केवळ पाच दिवसांत सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅम ७००० रुपयांची वाढ झाली. यामुळे सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १ लाख ४९ हजार ६२१ रुपयांच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचला.

चांदीच्या दरातही मोठी वाढ झाली. सोन्याप्रमाणेच चांदीच्या दरातही मोठी वाढ झाली. या पाच दिवसांत ९९.९ टक्के शुद्ध चांदीचा भाव प्रति किलोग्रॅम १४००० रुपयांनी वाढून प्रति किलोग्रॅम २ लाख ३१ हजार ३८१ रुपयांच्या ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचला आहे.

किमतींमध्ये ही ऐतिहासिक वाढ का झाली?

सोन्या-चांदीच्या किमतींमधील या वाढीमागे अनेक प्रमुख कारणे आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध हे एक प्रमुख कारण आहे. मध्य-पूर्वेतील गंभीर संकटामुळे जागतिक बाजारपेठांमध्ये अनिश्चितता निर्माण झाली आहे. परिणामी, गुंतवणूकदार शेअर बाजारासारख्या जोखमीच्या पर्यायांमधून निधी काढून घेत आहेत आणि सोन्यामध्ये गुंतवणूक करत आहेत, ज्याला एक सुरक्षित गुंतवणूक मानले जाते. यामुळे सोन्याची मागणी वाढत आहे, ज्यामुळे किमती वाढत आहेत. अमेरिकन फेडरल रिझर्व्हची धोरणे देखील मौल्यवान धातूंमधील या प्रचंड वाढीसाठी जबाबदार आहेत. अमेरिकेतील रोजगार आणि महागाईच्या आकडेवारीमुळे अमेरिकेची मध्यवर्ती बँक, अमेरिकन फेडरल रिझर्व्हकडून आगामी काळात व्याजदरात कपात होण्याची शक्यता वाढली आहे. सामान्यत:, जेव्हा व्याजदर कमी होतात, तेव्हा सोन्याची मागणी वाढते आणि किमती झपाट्याने वाढतात. जेव्हा व्याजदर कमी होतात, तेव्हा बँक एफडी आणि सरकारी रोख्यांवरील परतावा कमी होतो, त्यामुळे गुंतवणूकदार अधिक नफ्यासाठी सोन्यामधील गुंतवणूक वाढवतात.

## राष्ट्रवादीला अर्थखाते मिळणार नाही, रोहित पवारांच्या दाव्याने खळबळ; सुनेत्रा पवारांना अमित शाहांनी भेट नाकारल्याचा दावा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडे पुन्हा एकदा अर्थखातं सोपवलं जाणार असल्याच्या चर्चा मागील काही दिवसांपासून सुरू आहेत. मात्र, अद्याप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे अर्थखातं देण्यात आलेलं नाही. याच मुद्यांवर बोलताना आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. 'राष्ट्रवादीला (अजित पवार) अर्थखातं मिळण्याची शक्यता कमी आहे', असा दावा रोहित पवार यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या गोटात खळबळ उडाली आहे.

रोहित पवार काय म्हणाले?

''केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे नुकतेच मुंबईत आले होते. मात्र, अमित शाह यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट नाकारली. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला एवढे महत्वाचे खाते (अर्थखातं) मिळेल असे वाटत नाही. खरे तर अर्थखात्याचा हक्क हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा आहे'', असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

''अजित पवार नसताना आता हळूहळू राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची ताकद कमी करण्याचा प्रयत्न भारतीय जनता पक्ष करत आहे. हे आम्ही याआधीही अनेकदा बोलून दाखवलेलं आहे. जर अर्थखातं हातात आलं तर बऱ्याच महत्त्वाच्या नाड्या हातात येतात, त्यामुळे भाजपाला आणि एकनाथ शिंदे यांच्या पक्षालाही हे नको असावं. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला अर्थखातं मिळेल असं मला तरी वाटत नाही'', असं आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

अर्थखात्याबाबत जय पवारांनी काय म्हटले होते?

अर्थखाते पुन्हा राष्ट्रवादीला मिळण्याबाबत जय पवार यांनी काही दिवसांपूर्वी मोठे भाष्य केले होते. बारामतीमधील एका कार्यक्रमात बोलताना जय पवार यांनी म्हटले होते की, ''सगळे बोलत आहेत की आपले अर्थखाते अजून आपल्या पक्षाकडे आले नाही. त्यामुळे काही ठिकाणी आपली विकास कामे थांबली आहेत. मात्र, असे नाहीये. अजितदादा आपल्याला अचानक सोडून गेले आणि त्यानंतर लगेचच अर्थसंकल्प होता. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थखातं त्यांच्याकडे घेण्याचा निर्णय घेतला. पण आता काही दिवसांपूर्वीच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार आणि आमची सर्वांची चर्चा झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला सांगितले आहे की लवकरात लवकर अर्थखाते आपल्याला दिलं जाईल. अजित पवार यांचे विकास कामांबाबतचें जे स्वप्न होते, ते आपण पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू'', असे जय पवार यांनी म्हटले होते.

## कौटुंबिक वाद विकोपाला, सख्या चुलतभावानेच संपवले भावाला, धक्कादायक घटनेने अकोला हादरले



दैनिक आपला विदर्भ

**अकोला । प्रतिनिधी :** अकोला जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. बाळापूर पोलीस स्टेशन हद्दीतील निंबी मालोकार येथे दोन सख्या चुलतभावामध्ये झालेला वाद जीवघेणा ठरला आहे. गोळीबारात एकाचा मृत्यू झाला आहे. अमोल मालोकार असं मृतक व्यक्तीचे नाव आहे. तर अजय मालोकार असं आरोपीचं नाव असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कौटुंबिक वादातून ही हत्या झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत पोलिस अधिकचा तपास करत आहेत.

शेतीच्या वादातून एका युवकाची गोळ्या झाडून हत्या केली. एक नव्हे तर ३ ते ४ गोळ्या झाडून युवकाला जागीच ठार केलं आहे. अमोल गजानन मालोकार असं हत्या करण्यात आलेल्या युवकाचे नाव आहे. दरम्यान, मृत अमोल मालोकार याच्याचं दूरच्या चुलत भावानेचं गोळ्या झाडून हत्या केल्याचं बोलल्या जाते. अकोला शहरापासून १० किमी अंतरावर असलेल्या 'नींबी मालोकार' गावात ही घटना घडली. आज सायंकाळच्या सुमारास निंबी मालोकार शेतशिवारात अमोलच्या कानामध्ये आणि इतर ठिकाणी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. मात्र, शेतकरी कुटुंबात संपत्तीचा वाद थेट जीवावर बेतल्याची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे.

मृत अमोल गजानन मालोकार याची हत्या त्याच्याचं चुलत भाऊ अजय नामक व्यक्तीने केल्याचे बोलले जाते. अजय याच्यावर सध्या पोलिसांना संशय आहे, घटना घडल्यापासून तो फरार आहे. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी निंबी मालोकार गावात दाखल झाले आहे. गोळीबार करणाऱ्या आरोपीच्या शोधार्थ पोलिसांकडून चार पथक गठीत करण्यात आले. लवकरच आरोपीला अटक करण्यात येईल, असं आश्वासन अकोल्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी मृत कुटुंबीयांच्या नातेवाईकांना दिलंय. दरम्यान, या प्रकरणात बाळापुर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान अजय नामक व्यक्तीने अमोलच्या कानात आणि इतर ठिकाणी गोळ्या झाडून त्याला कायमचं संपवलं आहे.

अजय मालोकार हा दिवंगत मनसे कार्यकर्ता जय मालोकार यांचा मोठा भाऊ आहे. दोन वर्षापूर्वी जय मालोकारचा अमोल मिटकरी यांच्या गाडीवर हल्ला झाल्यानंतर हृदयविकाराने मृत्यू झाला होता. कौटुंबिक वादातून हत्या झाल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, या घटनेमुळं अकोला जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

## मन हेलावून टाकणारी घटना! चुलत बहीण-भावाचा गोदावरीच्या पाण्यात बुडून मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** गंगापूर तालुक्यातील अमळनेर वस्ती येथे गोदावरी नदीच्या प्रवाहात पडून सख्ख्या चुलत बहीण-भावाचा मृत्यू झाला आहे. ही घटना रविवारी (ता. ९ ऑगस्ट २०२६) दुपारी बाराच्या सुमारास घडली. आयुष रवींद्र मिसाळ (वय वर्ष ३) आणि तनवी अविनाश मिसाळ (वय वर्ष २) वर्ष असं पाण्यात बुडून मृत्यू झालेल्या चिमुकल्यांची नावं आहेत. या घटनेने अमळनेर परिसरात शोककळा पसरली असून चिमुकल्यांच्या जाण्यानं सर्वत्र हळहळ व्यक्त होतेय. आयुष हा रवींद्र मिसाळ यांचा एकुलता एक मुलगा, तर तन्वी ही अविनाश मिसाळ यांची एकुलती एक मुलगी होती. या दुर्दैवी घटनेमुळं मिसाळ कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

कुटुंबीयांची नजर चुकवून पाण्याजवळ गेली मुलं : मिळालेल्या माहितीनुसार, ही दोन्ही मुलं आपापसात खेळत असताना कुटुंबीयांची नजर चुकवून घराशेजारीच असलेल्या गोदावरी नदीच्या वाढलेल्या पाण्याच्या प्रवाहाकडं गेली. बराच वेळ ही मुलं दिसून न आल्यानं कुटुंबीयांनी सर्वत्र शोधाशोध केली. काही वेळानंतर दोन्ही मुलं गोदावरी नदीच्या पाण्यात तरंगताना नागरिकांना आढळून आल्यानं त्यांनी तत्काळ ही माहिती कुटुंबीयांना दिली.

कुटुंबीयांनी तत्काळ घटनास्थळाकडे धाव घेत नागरिकांच्या मदतीनं चिमुकल्यांना पाण्याबाहेर काढलं. रुग्णवाहिका चालक वैभव इस्टके, सागर वाघमारे यांच्या मदतीनं गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आलं. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.

कुटुंबीयांचा आक्रोश, शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार : चिमुकल्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची माहिती समजतात त्यांच्या कुटुंबीयांनी एकच आक्रोश केल्याने उपस्थितांचे डोळेही पाणावले. अमळनेर वस्ती येथेच दोन्ही मुलांवर सायंकाळी ५ वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या दुर्दैवी घटनेमुळे अंबळनेर परिसरात शोककळा पसरली असून चिमुकल्यांच्या जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे.

## खळदच्या महाआरोग्य शिबिरात अवयवदाते कुटुंबाचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते सन्मान

दैनिक आपला विदर्भ

**बारामती । प्रतिनिधी :** पुरंदर तालुक्यातील नागरिकांसाठी स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त खळद येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात अवयवदाते सुबनावळ कुटुंबीयांचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

मागील वर्षी इंदापूर तालुक्यातील कै. हिराबाई सुबनावळ यांचे ब्रेनडेड झाल्यानंतर उपमुख्यमंत्री वैद्यकीय



सहायता कक्षामार्फत कुटुंबीयांचे समुपदेशन करण्यात आले होते. त्यानंतर त्यांचे पुत्र कैलास सुबनावळ यांनी अवयवदानासाठी सहमती दर्शविली. त्यांच्या या धाडसी आणि मानवतावादी निर्णयामुळे तब्बल पाच जणांना जीवनदान मिळाले.

यावेळी कैलास सुबनावळ यांनी, ''जळून राख होण्यापेक्षा आईला अवयवदानरूपी जिवंत ठेवले,''अशी भावना व्यक्त केली. इंदापूर तालुक्यातील एका छोट्या गावातील कुटुंबाने घेतलेला हा सामाजिकदृष्ट्या प्रेरणादायी निर्णय समाजासाठी आदर्श ठरत आहे. या शिबिरात तब्बल ८ हजार ८८० लाभार्थींनी आरोग्यसेवेचा लाभ घेतला. शिबिराततपासणीदरम्यान सुमारे २ हजार रुग्णांमध्ये विविध आजारांचे निदान झाले. या रुग्णांवर पुढील पंधरवड्यापासून महिनाभराच्या कालावधीत विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून उपचार उपलब्ध करून देण्यासाठी उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षामार्फत नियोजन करण्यात आले आहे.

या महाआरोग्य शिबिरात अवयवदानाबाबत जनजागृतीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी अवयवदानाचे महत्त्व, त्यातून मिळणारे जीवनदान आणि समाजातील गैरसमज दूर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले, अशी माहिती उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे महादेव मगर (संपर्क ९८५०५१२२२३) यांनी कळविली आहे.

## वृत्तविशेष...

### नालासोपाऱ्यात कोयत्याने पिता-पुत्रावर जीवघेणा हल्ला; मुलाची प्रकृती गंभीर, वडिलही थोडक्यात बचावले रुग्णालयात उपचार

**दैनिक आपला विदर्भ**

**पालघर । प्रतिनिधी** : राज्यातील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये काही केल्या कमी होताना दिसून येत नाही. त्यातच, गंभीर स्वरुपाचे गुन्हे देखील सातत्याने घडत आहेत. नालासोपारा पूर्वेतील श्रीरामनगर परिसरात आज दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास चक्क कोयत्याने पिता-पुत्रावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शेरू अहमद खान आणि त्यांचा मुलगा अतीफ खान हे दोघेही पिता-पुत्र असून, त्यांच्यावर अजीज आणि अज्जू या दोघांनी कोयत्याने हल्ला करण्यात आला आहे. सध्या वडिलांची प्रकृती स्थिर असून मुलगा गंभीर जखमी आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केलाय.

नालासोपारातील या हल्ल्याच्या घटनेनं परिसरात खळबळ उडाली आहे. शेरू अहमद खान आणि अतीफ खान हे दोघेही गंभीर जखमी झाले असून, अतीफ खानची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. प्रथमदर्शनी मिळालेल्या माहितीनुसार, श्रीरामनगर परिसरातील एका मदरशामधील मुलींशी छेडछाडीचे प्रकार वाढल्याच्या तक्रारीनंतर, शेरू अहमद खान आणि त्यांचा मुलगा अतीफ हे संबंधितांना समजावून सांगण्यासाठी गेले होते. त्याचवेळी त्यांच्यावर कोयत्याने हल्ला करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरू असून, हल्ल्यामागील नेमके कारण आणि घटनेची संपूर्ण पार्श्वभूमी तपासली जात आहे.

दरम्यान, एखाद्याच्या जीवाची काही किंमत आहे की नाही, माझ्या भावाला चाकूने मारहाण केली असून वडिलांनाही ते मारत होते. त्यावेळी, मी तिथे असल्याने ओरड केली, सुदैवाने वडिलांना जीव वाचला. सध्या भाऊ देखील रुग्णालयात असून त्याची प्रकृती गंभीर असल्याचं हल्ल्यातील जखमी आतीफ खानची बहीण शबीना खान यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले.

### रायगडमध्ये राज ठाकरेंच्या दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद; माणगावात बाईक रॅली, ढोल-ताशांसह खालुबाजाच्या गजरात जंगी स्वागत!

**दैनिक आपला विदर्भ**

**रायगड । प्रतिनिधी** : मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांच्या रायगड दौऱ्याला माणगावमध्ये उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला. राज ठाकरे यांचा ताफा माणगावमध्ये दाखल होताच मनसे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत जोरदार स्वागत केले. त्यांच्या स्वागतासाठी शहरातून बाईक रॅली काढण्यात आली, तर पक्ष कार्यालयाच्या ठिकाणी कोकणातील पारंपरिक खालुबाजा आणि ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

माणगाव मनसे पक्ष कार्यालयाचे उद्घाटन : राज ठाकरे यांच्या हस्ते माणगाव येथील मनसे पक्ष कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. दक्षिण रायगड जिल्ह्याच्या वतीने राज पार्टे यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. यानंतर राज ठाकरे यांनी रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्गाच्या कामांसह माणगाव बायपासची पाहणी केली. महामार्गाची रखडलेली कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

मनसे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य : या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर माणगाव शहरात ठिकठिकाणी मनसेकडून बॅनरबाजी करण्यात आली होती. तसेच पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. राज ठाकरे यांच्या आगमनामुळे रायगडमधील मनसे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.

### अश्वारुढ तिरंगा यात्रा संचलनातून क्रान्तिकारकांना अभिवादन... क्रांतिदिनी पुण्यात प्रथमच .....

**पुणे । प्रतिनिधी** : 'भारत माता की जय...', 'वंदे मातरम...' अशा विविध घोषणा, अश्वावर स्वार होऊन हाती तिरंगा ध्वज घेत भारताच्या स्वातंर्त्यलढ्यातील क्रांतिकारकांच्या त्याग, शौर्य आणि राष्ट्रभक्तीच्या स्मृतींना अश्वारोहकांनी अभिवादन केलं. दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्स रायडिंग अकॅडमीतर्फे क्रांतिदिनानिमित्त पुण्यात प्रथमच अश्वारूढ तिरंगा यात्रा संचलन आयोजित करण्यात आलं होतं. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचं दर्शन घेऊन मंदिरापासून या अश्वारूढ संचलनाला प्रारंभ झाला. यावेळी परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले यांनी अश्वावर स्वार होत हाती तिरंगा ध्वज घेत यात्रेत सहभाग घेतला.

यात्रेमध्ये १५ घोडेस्वारांचा सहभाग : श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचं दर्शन घेऊन यात्रेला प्रारंभ झाला. बेलबाग चौक, लक्ष्मी रस्ता मार्गे ही यात्रा मार्गस्थ झाली. तर, टिळक चौक, लकडी पूल मार्गे छत्रपती संभाजी महाराज स्मारक इथं यात्रेचा समारोप झाला. विश्रामबाग विभाग पुणे शहर सहाय्यक पोलीस आयुक्त अनुजा देशमाने, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विकास भिंगारदिवे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज स्मारकास पुष्प वाहून राष्ट्रगीतानंतर यात्रेचा समारोप झाला.

## पाय धुण्यासाठी उतरले अन् काळाने घात केला; कोराडी प्रकल्पातील खोल खड्ड्यात बुडून दोन मावस भावांचा दुर्दैवी मृत्यू

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर। प्रतिनिधी** : मेहकर तालुक्यातील कोराडी मध्यम सिंचन प्रकल्पाच्या परिसरात पाय धुण्यासाठी पाण्यात उतरलेल्या दोन मावस भावांचा खोल पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी घडली. या घटनेने देऊळगाव माळी आणि लोणार परिसरावर शोककळा पसरली असून, दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मृतांमध्ये आयान राजू शेख (वय १०, रा. देऊळगाव माळी, ता. मेहकर) आणि आवेद इब्राहिम शेख (वय ११, रा. लोणार) या दोन मावस भावांचा समावेश आहे. शनिवारी रात्री उशिरा आयानचा मृतदेह बाहेर काढण्यात आला, तर आवेदचा मृतदेह रविवारी (९ ऑगस्ट) सकाळी शोध पथकाच्या अथक प्रयत्नांनंतर बाहेर काढण्यात यश आले.





मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आयान आणि आवेद हे शेख आसिफ शेख हुसेन यांच्यासोबत कोराडी धरणाच्या परिसरात गेले होते. याच ठिकाणी देऊळगाव माळी, सुलतानपूर आणि लोणार शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या योजनांचे प्लांट आहेत.

पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी कंत्राटदाराने परिसरात अंदाजे १५ बाय ४५ आकाराचा खोल, खाणीसदृश्य खड्डा खोदला होता. काम पूर्ण झाल्यानंतर हा खड्डा बुजवणे किंवा त्याभोवती सुरक्षेसाठी कुंपण उभारणे अपेक्षित असताना तो उघडाच ठेवण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

दरम्यान, धरणातील पाणी या खड्ड्यात साचले होते. पाण्याची खोली लक्षात न आल्याने दोन्ही मुले पाय धुण्यासाठी पाण्यात उतरली. मात्र काही क्षणांतच ती खोल पाण्यात बुडाली. सोबत असलेल्या व्यक्तीने प्रसंगावधान राखून एका मुलीला सुरक्षित बाहेर काढले; मात्र आयान आणि आवेद यांना वाचवता आले नाही. घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी तातडीने शोधकार्य सुरू केले. शनिवारी मध्यरात्री सुमारास मेहकर येथील माळीपेठ परिसरातील युवकांनी अथक प्रयत्न करून आयान शेखचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढला. मात्र आवेदचा शोध सुरूच होता.

रविवारी सकाळी पाणबुडी पथकातील कृष्णा लक्ष्मण आगळे आणि माऊली आगळे (रा. पैठण) यांच्या खाजगी पथकाने शोधमोहीम राबवत आवेदचा मृतदेहही पाण्यातून बाहेर काढला. घटनास्थळी कोणत्याही प्रकारचा सुरक्षेचा इशारा, सूचना फलक किंवा संरक्षक व्यवस्था नसल्यानेच ही दुर्घटना घडल्याचा आरोप पीडित कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी केला आहे. लहान मुलांच्या निष्पाप जीवांना धोका निर्माण करणारा हा खड्डा उघडा का ठेवण्यात आला, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

या दुर्घटनेला जबाबदार असलेल्या कंत्राटदारावर तात्काळ सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी संतप्त ग्रामस्थ आणि पीडित कुटुंबीयांनी केली आहे.

दोन चिमुकल्या मावस भावांचा एकाच दुर्घटनेत झालेला दुर्दैवी अंत त्यांच्या कुटुंबीयांसाठी कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण करणारा ठरला आहे. या घटनेने परिसरातील नागरिकांमध्येही तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

## व्यवहारिक मराठी न येणाऱ्या रिक्षा-टॅक्सी चालकांवर १७ ऑगस्टनंतर कारवाई: प्रताप सरनाईक

**ठाणे । प्रतिनिधी** : व्यवहारिक मराठी न येणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांविरोधात १७ ऑगस्टनंतर कारवाई अटळ असल्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. तसेच, १ मे पासून सुरू झालेल्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी शिकवणी अभियाना'मध्ये आतापर्यंत एक लाखांहून अधिक अम राठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी व्यवहारिक मराठीचे प्रशिक्षण पूर्ण केल्याची माहिती सरनाईक यांनी दिली.



परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी रविवारी ठाण्यात पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पत्रकार परिषदेस प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी, मुंबई मराठी साहित्य संघ, राज्य मराठी विकास संस्था आणि कोकण मराठी साहित्य परिषदचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना १५ ऑगस्टपर्यंत व्यवहारिक मराठी अनिवार्य करण्यात आली आहे. त्यानुसार १ मे पासून राज्यभरात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी शिकवणी अभियान राबविण्यात आले होते. या अभियानाच्या माध्यमातून अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना व्यवहारिक मराठीचे प्रशिक्षण दिले जात होते. या अभियानाची मुदत १५ ऑगस्टला पूर्ण होत असून अभियानाचा समारोप १७ ऑगस्टला ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतन येथे होणार आहे. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच मराठी भाषा मंत्री उदय सामंत उपस्थित राहणार आहेत. राज्यभर राबविण्यात आलेल्या या अभियानाला मोठा प्रतिसाद मिळाला असून आतापर्यंत १ लाखांहून अधिक अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी व्यवहारिक मराठीचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. उर्वरित चालकांनीही १५ ऑगस्टपूर्वी प्रशिक्षण पूर्ण करावे. १७ ऑगस्टनंतर मराठी न येणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांविरोधात कारवाई अटळ असल्याचे सरनाईक म्हणाले.

राज्यात व्यवसाय करायचा असेल, तर मराठीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे. राज्यात रोजगार करायचा असेल, तर मराठीशी नाळ जोडलीच पाहिजे. ही सक्तीची नव्हे, तर आपुलकीची भाषा आहे. प्रवाशांशी दोन प्रेमाचे शब्द मराठीत बोलणारा प्रत्येक चालक हा म हाराष्ट्राच्या संस्कृतीचा सन्मान करणारा दूत ठरतो असेही ते म्हणाले. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून म हाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि संस्कृतीचा आत्मा आहे. महाराष्ट्रात उपजीविका करणाऱ्या प्रत्येकाने मराठीचा सन्मान करावा. आम्ही कोणाच्याही विरोधात भूमिका घेतली नाही. महाराष्ट्रावर, मराठी मातीवर आणि मराठी भाषेवर प्रेम करणारा प्रत्येकजण आमच्यासाठी तितकाच महत्त्वाचा आहे. मात्र महाराष्ट्रात काम करताना मराठी भाषेचा सन्मान राखणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले.

राज्य सरकारने मानवतावादी दृष्टिकोनातून पुढाकार घेत अमराठी चालकांना मराठी शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली. प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) चालकांशी मराठीत संवाद साधतील. त्या संवादामध्ये चालकाला मराठीत उत्तर देता आले, तरच त्याने नियमांचे पालन केल्याचे मानले जाईल. मराठी न येणाऱ्यांविरोधात कायद्यामध्ये जे नमूद आहे त्यानुसारच कारवाई होईल. आरटीओ अधिकारी तपासणी करतील आणि आवश्यक ती कार्यवाही करतील. कायद्याच्या कक्षेत राहूनच पुढील निर्णय घेतले जातील असेही सरनाईक यांनी सांगितले.

### हे अत्यंत लज्जास्पद! फॅनने चक्क कॅमेरासमोरचे केले लिप-लॉक किस

**मुंबई । प्रतिनिधी** : बॉलिवूड अभिनेत्री निकिता रावलचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. एका कार्यक्रमाच्या रेड कार्पेटवर एका महिला चाहतीने अभिनेत्रीला अचानक किस केल्याची घटना कॅमेऱ्यात कैद झाली. या प्रकारामुळे निकिता काही क्षणांसाठी गोंधळल्याचे व्हिडीओमध्ये दिसत आहे.

८ ऑगस्ट रोजी निकिता रावल एका कार्यक्रमाच्या रेड कार्पेटवर फोटोग्राफर्ससाठी पोज देत होती. त्यावेळी एक महिला चाहती तिच्याजवळ आली आणि सेल्फी घेण्याची इच्छा व्यक्त केली. निकितानेही हसत तिच्यासोबत फोटो काढला. सेल्फीनंतर चाहतीने आधी अभिनेत्रीच्या गालावर किस केले. त्यानंतर मात्र या चाहतीने अचानक निकिताला जवळ घेत तिच्या ओठांवर किस केले. या अनपेक्षित प्रकारामुळे अभिनेत्री काही क्षणांसाठी अस्वस्थ झाल्याचे दिसले. तिने लगेच आपल्या ओठांवर हात ठेवला आणि परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमस्थळी उपस्थित असलेल्या काही लोकांचेही या घटनेकडे लक्ष गेले.

या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर केला जात आहे. व्हिडीओ समोर आल्यानंतर नेटकऱ्यांकडून विविध प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. चाहत्यांनी कलाकारांबद्दल व्यक्त करताना त्यांच्या वैयक्तिक मर्यादांचाही विचार करायला हवा, अशी चर्चा सोशल मीडियावर सुरू झाली आहे.निकिता रावलने बॉलिवूडसोबतच दक्षिण भारतीय चित्रपटांमध्येही काम केले आहे. 'ब्लॅक अँड व्हाईट', 'मिस्टर हॉट मिस्टर कूल', 'द हिरो – अभिमन्यू' आणि 'अम्मा की बोली' यांसारख्या चित्रपटांमध्ये ती दिसली आहे. अभिनयासोबतच ती विविध कार्यक्रमांमध्येही सहभागी होत असते. सध्या रेड कार्पेटवरील या अनपेक्षित घटनेमुळे निकिता रावलचा व्हिडीओ सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे.

## कोयत्याला तलवारीने उत्तर देणार असाल, तर पोलीस कारवाई करणारच! गृह राज्यमंत्री योगेश कदमांचा मनोज जरांगेंना थेट इशारा

**दैनिक आपला विदर्भ**

**अहिल्यानगर । प्रतिनिधी** : 'तुम्ही कोयते हातात घेणार असाल, तर म राठ्यांच्या हातात तलवारी आहेत,' असा इशारा राज्य सरकार आणि नेत्यांना मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी दिला होता. यानंतर 'कुठंही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोलीस कारवाई करतील,' असा थेट इशारा गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी मनोज जरांगे यांना दिलाय. राज्यमंत्री योगेश कदम रविवारी (दि.९) जागतिक आदिवासी दिनानिमित्त अकोले दौऱ्यावर असताना माध्यमांशी बोलत होते.



अमोल मिटकरींचा रायगडशी काही संबंध नाही : ''मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील चांगलं काम करत आहेत. जरांगे यांनी आपलं लक्ष विचलित होऊ देऊ नये. सरकार मराठा आरक्षणाबाबत सकारात्म क आहे. समाजाला दिलेली प्रमाणपत्रं भविष्यातही कायदेशीरदृष्ट्या पूर्ण वैध ठरतील, अशी व्यवस्था केली जात आहे. अमोल मिटकरी यांचा रायगड जिल्ह्याशी काही संबंध नाही. त्यांचा त्यांच्या पक्षात खच्चीकरण केलं जातंय. त्यांनी स्वत:बद्दल विचार केला तर बरं होईल,'' असं गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं.

हे संजय राऊत यांनी पंतप्रधान म ोदींना शिकवू नये : फुटीर खासदारांना पंतप्रधानांना भेटण्यासाठी वेळ आहे. मात्र संसदेत यायला वेळ नाही, असं म्हणत खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान मोदींवर टीका केली. यावर बोलताना कदम म्हणाले की, ''पंतप्रधानांनी संसदेत कार्यकाळ कसा हाताळावा, हे संजय राऊत यांनी शिकवू नये. अधिवेशन हे कायदा तयार करण्यासाठी असतं. जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी अधिवेशन म हत्त्वाचं असतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी योग्य वेळी योग्य निर्णय घेतात. त्यामुळं संजय राऊत यांच्या आरोपांना उत्तर देण्याची आवश्यकता नाही.''

...तर आज गणेश नाईक मंत्री नसते : गणेश नाईक यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या टीकेचा सम ाचार घेताना कदम म्हणाले, ''आपण महायुतीतसोबत काम करत आहोत. एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षे मुख्यमंत्री म्हणून काम केलं. अनेक धाडसी निर्णय घेतले नसते. तर आज गणेश नाईक मंत्री झाले नसते. याची जाणीव त्यांनी ठेवली पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोघांमध्ये समन्वय आहे. महायुतीमध्ये कुठंही कटुता येऊ नये. यासाठी गणेश नाईक यांच्यासारख्या वरिष्ठ नेत्यानं काळजी घेतली पाहिजे. नाईक यांनी अशी वक्तव्यं थांबवून आपल्या मनातील खदखद पक्षाच्या वरिष्ठांकडं मांडावी आणि कायमस्वरूपी थांबावी.''

मुंबई-गोवा महामार्गाचं काम लवकर पूर्ण होईल : ''सर्वात जास्त प्रवास आम्ही मुंबई-गोवा महामार्गावरून करतो. पेण ते माणगावदरम्यानच्या टप्प्यात अडचणी आल्या आहेत. सध्या इंदापूर आणि माणगाव या दोन बायपासचं काम बाकी आहे. पुढील ६ ते ८ महिन्यात हे काम पूर्ण होईल. या विलंबाबद्दल जनतेमध्ये असलेली नाराजी रास्त असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडंही या महामार्गासाठी वारंवार पाठपुरावा सुरू आहे,'' असं सांगत राज्यमंत्री योगेश कदम यांनी मुंबई-गोवा महामार्गाचं काम रखडल्याचं मान्य केलं.

संवेदनशील विषयांवर असंवेदनशीलपणे बोलणं चुकीचं : ''सोनिया गांधी ज्यावेळी काँग्रेसमध्ये पदावर आल्या, त्यावेळी त्यांची काय स्थिती होती? त्या किती बोलायच्या? याचा इतिहास काँग्रेसने अभ्यासावा. अशा संवेदनशील विषयांवर असंवेदनशीलपणे बोलणं चुकीचं आहे, असे म्हणत मंत्री योगेश कदम यांनी सुनेत्रा पवार यांच्या काँग्रेसनं केलेल्या टीकेवर भाष्य केले.

## बुलढाणा जिल्ह्याचे राजमाता जिजाऊनगर असं नामकरण होणार

### भाजप आमदार श्वेता महालेंचं मुख्यमंत्र्यांना पत्र, फडणवीसांकडून कार्यवाही करण्याचे निर्देश

**दैनिक आपला विदर्भ**

बुलढाणा जिल्ह्याचे नामकरण करण्याची मागणी होत आहे. बुलढाणा जिल्ह्याचे नाव राजमाता जिजाऊनगर करा, अशी मागणी भाजप आमदार श्वेता महाले यांनी केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना श्वेता महाले यांनी पत्र देऊन नामकरण करण्याची मागणी केली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी तात्काळ दखल घेत प्रशासनाला कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

राजमाता जिजाऊंच्या नावाने बुलढाणा जिल्ह्याची नवी ओळख निर्माण होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आता बुलढाण्याचे नाव बदलण्यात येणार आहे. राजमाता जिजाऊंच्या नावाने बुलढाणा जिल्ह्याची नवी ओळख निर्माण होण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. राजमाता जिजाऊंच्या जन्मभूमीला त्यांचे नाव देऊन भूमीचा सन्मान व्हावा असे श्वेता महाले यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात म्हटलं आहे. दरम्यान, या आधी उस्मानाबाद जिल्ह्याचे धाराशिव असे नामकरण करण्यात आले आहे. त्याचबरोबर औरंगबादचे छत्रपती संभाजीनगरस असे नामकरण करण्यात आले आहे. त्यामुळं आता बुलढाणा जिल्ह्याचं देखील नामकरण करण्याची मागणी जोर धरत आहे. भाजप आमदार श्वेता महाले यांनी मुख्यमंत्र्यांकडे बुलढाणा जिल्ह्याचे नाव राजमाता जिजाऊनगर करा, अशी मागणी केली आहे. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील दखल घेत प्रशासनाला कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

राजमाता जिजाऊसाहेबांच्या जन्मभूमीचा सन्मान आणि असंख्य शिवप्रेमींच्या भावनांचा आदर करण्यासाठी बुलढाणा जिल्ह्याचे नाव राजमाता जिजाऊनगर करण्याची मागणी त्यांनी निवेदनातून केली आहे. त्यात नमूद करण्यात आले की, मातृतीर्थ सिंदखेड राजा ही राजमाता जिजाऊसाहेबांची जन्मभूमी आहे, ही संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यासाठीच नव्हे,



तर महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. बाल शिवबांच्या मनात हिंदवी स्वराज्याचे बीज पेरून छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या युगपुरुषाला घडवण्यात राजमाता जिजाऊसाहेबांचे योगदान अतुलनीय आहे.